ग्राम विकास व जलसंधारण विभागातील क्षेत्रीय स्तरावरील तसेच मंत्रालय (खुद्द) येथील गुणवंत अधिकारी / कर्मचारी यांचा गुणवंत अधिकारी / कर्मचारी म्हणून गौरव करण्याची योजना.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्रमांक- पुरस्कार-२००५ / प्र.क्र.८३६ / समन्वय कक्ष
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक - ०२ सप्टेंबर, २००५.

14 SEP 2005
उप मु.का.अ.(सा)

ग्राम विकास व जलसंधारण विभागांतर्गत राज्य शासनाच्या तसेच केंद्र पुरस्कृत अनेक योजना व प्रकल्प राबविले जातात. अशा काही योजना / प्रकल्प राबवितांना संबंधित अधिकारी तसेच कर्मचा-यांचे प्रशासकीय तसेच तांत्रिक कौशल्य पणाला लागते. असे प्रकल्प पूर्ण करतांना अधिकारी, कर्मचा-यांमध्ये विशेष वैयक्तिक कौशल्य व गुणवत्ता आढळून येते. अशा अधिकारी / कर्मचा-यांचा गौरव करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. शासनाने याबत सांगोपांग विचार करुन ग्राम विकास व जलसंधारण विभागातील क्षेत्रीय स्तरावरील व मंत्रालयातील अधिकारी व वर्ग-३ च्या (तांत्रिक व अतांत्रिक धरुन) संवर्गातील गुणवंत अधिकारी / कर्मचा-यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यासंदर्भात खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे :-

## शासन निर्णय :-

ग्राम विकास विभागातील सर्व अतांत्रिक संवर्गातील गट-१, गट- २, गट-३ च्या तसेच सर्व तांत्रिक संवर्गातील गट- २ व ३ च्या अधिकारी / कर्मचा-यांचा (अन्य विभागाकडून नियुक्त केलेले गट-१ व २ चे अधिकारी आणि प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक वगळून ) त्यांनी प्रशासकीय व वैयक्तिक कौशल्य पणाला लावून शासकीय कामात दाखविलेल्या नैपुण्याबद्दल व शासकीय कामात गतिमानता आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल प्रतिवर्षी प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गुणवंत अधिकारी / कर्मचारी म्हणून गौरव करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. महाराष्ट्र विकास सेवा संवर्गातील अधिका-यांना पुरस्कार देण्याबाबतच्या योजनेचा तपशील सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये व जिल्हा परिषदांच्या आस्थापनेवरील गट-३ व ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय (खुद्द) च्या आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांना द्यावयाच्या पुरस्कार योजनेचा तपशील परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केला असून त्यानुसार गुणवंत अधिकारी / कर्मचारी यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन २००५-०६ पासून गौरविण्यात येईल.

...री अधिकारी
...षद, जळगांव.



(८४)

या प्रयोजनासाठी होणारा सर्व खर्च हा पुरस्कार समारंभ ज्या विभागीय आयुक्तालयाच्या क्षेत्रात आयोजित करण्यात येईल, त्या विभागीय आयुक्तालयाने त्यांना मंजूर केलेल्या कार्यालयीन खर्चातून करावा व तो "२०५३ - जिल्हा प्रशासन - ०९३ - जिल्हा आस्थापना, १०१-आयुक्त (०१) (०१), पंचायती राज संस्थांसाठी निरीक्षण पथके ( मागणी क्र.एल-२ ) ( २०५३०५९२ ) ( योजनेतर ) ( दत्तमत )" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

सदर आदेश सामान्य प्रशासन विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक असं-२१५/१६-अ, दिनांक ०५.०७.२००५ व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.असं-२७७ / व्यय-१५, दि.२५.०७.२००५ नुसार त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( डॉ.ज.मो.फाटक )
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

1. सामान्य प्रशासन विभाग (का-१२) मंत्रालय, मुंबई
2. महालेखापाल (१) लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१ मुंबई
3. महालेखापाल (१) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई
4. महालेखापाल (२) लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२ नागपूर
5. महालेखापाल (२) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-२ नागपूर
6. विभागीय आयुक्त, कोकण, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर
7. उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर
8. सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी
9. सर्व जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
10. सर्व जिल्हा परिषदेचे सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी
11. सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
12. प्रधान सचिव (ग्रा.वि.व पं.रा.) ग्रा.वि. व ज.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई.
13. प्रधान सचिव (जलसंधारण ) ग्रा.वि. व ज.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई.
14. मा.मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
15. मा.उपमुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
16. मा.मंत्री (ग्राम विकास ) याचे खाजगी सचिव
17. मा.राज्यमंत्री (ग्राम विकास ) यांचे खाजगी सचिव
18. ग्राम विकास व जलसंधारण विभागातील सर्व अधिकारी / कार्यासन अधिकारी / शाखा / उपशाखाप्रमुख
19. कार्यासन अधिकारी (आस्था-१, आस्था-३, व वित्त- १) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
20. कार्यासन अधिकारी (समन्वय कक्ष) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई, निवड नस्ती

Scanned with OKEN Scanner

शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक- पुरस्कार-२००५/ प्र.क्र.८३६/ समन्वय कक्ष, दिनांक ०२ सप्टेंबर, २००५ चे सहपत्र.

## परिशिष्ट- "अ"

### विषय- महाराष्ट्र विकास सेवेतील अधिका-यांना प्रोत्साहन / पुरस्कार देण्याची योजना-

१) पुरस्काराचे स्वरुप:

पुरस्कार प्रशस्ती पत्र व सन्मान चिन्हाच्या स्वरुपात देण्यात यावा.

२) कोणत्या अधिका-यांना पुरस्कार द्यावेत :

महाराष्ट्र विकास सेवेतील गट "अ" व "ब" मधील, विहीत निकषाच्या आधारे शासन स्तरावर निवड केलेल्या अधिका-यांना वैयक्तिक पुरस्कार देण्यात यावेत.

३) अधिका-यांना पुरस्कार देण्यासाठी करावयाची विहीत कार्यपध्दती :

प्रत्येक विभागाच्या विभागीय आयुक्तांनी त्यांच्या विभागातील वरील अ.क्र.२ मध्ये नमूद केलेल्या व कार्यरत असलेल्या अधिका-यांपैकी व्यक्तीगत पुरस्कारासाठी निकष पूर्ण करणा-या २ ते ३ अधिका-यांची नावे सुचवावीत. अशी नावे सुचवितांना प्रत्येक विभागाच्या विभागीय आयुक्तांनी त्यांच्या नियंत्रणाखालील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याशी विचारविनिमय करुन नावे सुचवावीत. मात्र, एखाद्या संवर्गात पात्र व्यक्ती न आढळल्यास त्या संवर्गातील अधिका-यांचे नांव सुचविलेच पाहिजे असे नाही. परंतु याबाबतचा स्पष्ट उल्लेख इतर संवर्गातील अधिका-यांच्या नावांची शासनाकडे शिफारस करणा-या पत्रात संबंधित विभागीय आयुक्तांनी करणे आवश्यक आहे.

४) पुरस्काराचे निकष:

वैयक्तिक पुरस्कार देण्यासाठी निकष खालील प्रमाणे राहतील :-

अ) खात्यामध्ये मागील ५ वर्षांत केलेल्या एकूण कामाचा आढावा घेऊन पात्रता ठरविण्यांत यावी.

ब) सदर अधिका-यांनी गेल्या ५ वर्षांत केलेल्या कामगिरीच्या विवरणाची छाननी करुन त्या अधिका-यांच्या पात्रतेबद्दल विचार करण्यांत यावा.

क) वैयक्तिक अधिका-यांना पुढील बाबी लक्षांत घेऊन बक्षिसासाठी पात्र ठरविण्यांत यावे :

१) निर्विवाद सचोटी
२) निष्कलंक चारित्र्य
३) विभागीय चौकशी / न्यायालयीन प्रकरण नसावे
४) तांत्रिक कार्यक्षमता



Scanned with OKEN Scanner

५) बुध्दिमत्ता व त्यांनी विकसित केलेले तंत्रज्ञान
६) दिलेल्या कामाची वेळेमध्ये / वेळेपूर्वी केलेली उद्दीष्टपूर्ती
७) मंजूर निधीचा योग्य व नियोजनपूर्ण वापर
८) खात्याबाहेरील व्यक्तींनी / जागतिक शिष्टमंडळ इत्यादि संस्थांनी कामाबद्दल केलेली प्रशंसा
९) प्रसंगावधान राखून संकटकाळात केलेल्या उपाययोजनेमुळे टळलेली संभाव्य जीवित व वित्तहानी
१०) जनता व कर्मचारी यांच्याशी असलेल्या संबंधामुळे जनमानसात उंचावलेली प्रतिमा
११) वैशिष्ट्यपूर्ण केलेले काम व कामाचा दर्जा
१२) कार्यालयीन कामकाजात असणारे विशेष लक्ष व कार्यालयीन कामकाजाच्या पध्दतीत सुचविलेल्या सुधारणेमुळे व खर्चात होणारी बचत
१३) शासकीय आदेशांचे पालन
१४) विशिष्ट कामात असलेले प्राविण्य व त्याचा कामामध्ये केलेला उपयोग
१५) नवीन संकल्पना सुचविल्यामुळे कामाच्या खर्चामध्ये झालेली बचत
१६) संगणकीकरणाच्या कामामध्ये विशेष रस
१७) जनतेच्या व कर्मचाऱ्यांच्या तक्रारींच्या निवारणामध्ये दाखविलेली तत्परता
१८) इतर गुणवत्ता.

५. <u>ग्राम विकास विभागातील अधिकाऱ्यांची पुरस्कारासाठी अंतिम निवड करण्याची कार्यपध्दती :</u>

प्रत्येक विभागीय आयुक्तांकडून शासन स्तरावर पुरस्कार प्रदान करण्यासाठी महाराष्ट्र विकास सेवेतील अधिकाऱ्यांच्या वैयक्तिक नावांच्या शिफारशी आल्यानंतर सदर नावांमधून पुरस्कार देण्यासाठी अंतिम नावांची शासनास शिफारस करण्यासाठी शासन स्तरावरील समिती खालील प्रमाणे राहील :-

| | | |
|---|---|---|
| (एक) | प्रधान सचिव (ग्राम विकास व पंचायत राज ) | अध्यक्ष |
| (दोन) | प्रधान सचिव (जलसंधारण) | सह अध्यक्ष |
| (तीन) | उपसचिव (पंचायत राज) ग्रा.वि.व ज.सं.वि. | सदस्य |
| (चार) | उपसचिव (योजना ) ग्रा.वि. व ज.सं.वि. | सदस्य |
| (पाच) | का.अ.(आस्था-३) ग्रा.वि. व ज.सं.वि. | सदस्य सचिव |

अधिकाऱ्यांना पुरस्कार देण्याबाबत उपरोक्त समितीच्या शिफारशीवर अंतिम निर्णय शासन घेईल. अधिकाऱ्यांना पुरस्कार देण्याच्या निकषामध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार वरील समितीकडे राहतील.

६ वरील प्रमाणे विभागीय आयुक्तांकडून शिफारशी प्राप्त करुन घेऊन शासन स्तरावरील समितीच्या शिफारशी तयार करण्याच्या बाबी कार्यासन आस्थापना-०३ कडून हाताळल्या जातील.

७. अधिकाऱ्यांना पुरस्कार देण्याच्या योजनेचे दोन वर्षानंतर पुनर्विलोकन करण्यात येईल.

..........................



Scanned with OKEN Scanner

शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक- पुरस्कार-२००५/ प्र.क्र.८३६ / समन्वय कक्ष, दिनांक ०२ सप्टेंबर, २००५ चे सहपत्र.

# परिशिष्ट-"ब"

विषय - जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील वर्ग-३ च्या कर्मचारी तसेच मंत्रालय (खुद्द) येथील गुणवंत अधिकारी / कर्मचारी यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्याची योजना-

## अ: पुरस्काराचे स्वरुप:

पुरस्कार प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्हाच्या स्वरुपात असावा.

## ब: कोणत्या संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांना पुरस्कार देण्यात यावेत.

१) जिल्हा परिषदेच्या आस्थापनेकडील वर्ग-३ चे कर्मचारी (तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी व शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता धरुन आणि जिल्हा परिषदेमध्ये नियुक्त केलेले गट-१ व २ चे आणि जिल्हा परिषदेच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे शिक्षक वगळून).

२) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय (खुद्द) मधील गट-१ व गट-२ चे अधिकारी तसेच गट-३ चे कर्मचारी.

## क: पुरस्कारांची संख्या:

पुरस्कारांची संख्या खाली दर्शविल्याप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर यांच्या अधिपत्याखालील जिल्हा परिषदेचे वर्ग-३ चे कर्मचारी | उपरोक्त व (१) मधील प्रत्येकी ५ कर्मचा-यांची निवड करण्यांत यावी. |
| ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय ( खुद्द ) | २ ते ३ अधिकारी / कर्मचा-यांची निवड करण्यांत यावी. |

## ड: पुरस्कार देण्यासाठी विहीत करावयांची कार्यपध्दती व निवड समित्या:

प्रत्येक विभागीय आयुक्तांनी त्यांच्या नियंत्रणाखालील प्रत्येकी जास्तीत जास्त ५ अधिकारी / कर्मचा-यांच्या शिफारशी खालील निवड समितीमार्फत शासनास सादर कराव्यात. असे करतांना त्यांना आवश्यक वाटल्यास त्यांनी प्रत्येक जिल्हा परिषद स्तरावर समित्या स्थापन करुन प्रत्येक जिल्हा परिषद स्तरावरुन प्राथमिक स्वरुपाचे प्रस्ताव प्राप्त करुन घ्यावेत व त्या आधारे खालील निवड समितीमार्फत अंतिम प्रस्ताव / शिफारशी शासनास सादर कराव्यात.



Scanned with OKEN Scanner

ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय (खुद्द) येथील गट-१, गट-२ व गट-३ च्या अधिकारी कर्मचा-यांच्या संदर्भात संबंधित सर्व उपसचिवांनी त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकारी कर्मचा-यांच्या प्रत्येकी २ शिफारशी सादर कराव्यात. उपसचिव / सहसचिव पदावरील अधिका-यांच्या शिफारशी प्रधान सचिव (ग्राम विकास) व प्रधान सचिव (जलसंधारण) यांच्याकडून मागविण्यांत येतील.

**अ) क्षेत्रिय स्तरावरील वर्ग-३ च्या कर्मचा-यांच्या निवडी करीता समिती:**

| | |
|---|---|
| १) प्रत्येक विभागाचे विभागीय आयुक्त | अध्यक्ष |
| २) प्रत्येक विभागीय आयुक्तालयाच्या अखत्यारीतील २ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी | सदस्य |
| ३) प्रत्येक विभागीय आयुक्तालयातील उपायुक्त (आस्थापना) | सदस्य सचिव |

**ब) मंत्रालय (खुद्द) येथील अधिकारी / कर्मचा-यांच्या निवडी करीता समिती**

| | |
|---|---|
| १) प्रधान सचिव ( ग्राम विकास व पंचायत राज ) ग्राम विकास व जलसंधारण विभाग | अध्यक्ष |
| २) प्रधान सचिव (जलसंधारण ) ग्राम विकास व जलसंधारण विभाग | सहअध्यक्ष |
| ३) उपसचिव, जलसंधारण, ग्राम विकास व जलसंधारण विभाग | सदस्य |
| ४) उपसचिव, समन्वय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग | सदस्य |
| ५) उपसचिव, आस्थापना, ग्राम विकास व जलसंधारण विभाग | सदस्य |
| ६) कार्यासन अधिकारी (आस्था-१) ग्रा.वि. व ज सं वि | सदस्य सचिव |

टीप : परिच्छेद 'ड' मध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्राम विकास व जलसंधारण विभाग खुद्दबाबत उप सचिवांनी शिफारस केलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची नामनिर्देशने सदस्य सचिव, कार्यासन आस्था-०१ मार्फत निवड समितीस सादर करण्यांत यावीत.

**इः पुरस्कारासाठी निकषः**

१) अधिकारी / कर्मचा-यांची किमान १० वर्षे सेवा झालेली असावी.
२) अधिकारी / कर्मचा-यांची मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालांची प्रतवारी अतिउत्कृष्ट / उत्कृष्ट असावी.
३) अधिकारी / कर्मचा-यांची सचोटी व चारित्र्य उत्तम असावे.
४) विभागीय चौकशी / न्यायालयीन प्रकरण नसावे.
५) अधिकारी / कर्मचा-यांच्या कामात वक्तशीरपणा व कामाचा निपटारा उत्तम असावा.
६) अधिकारी / कर्मचा-यांमध्ये प्रशासकीय कौशल्य, कामात गतिमानता व नावीन्याची आवड असावी.
७) संगणकीकरणातील योगदान.
८) शासकीय खर्चात काटकसर /बचत व शासकीय उत्पन्न / महसूल वाढीसाठीचे योगदान.
९) शासनाची / जिल्हा परिषदेची प्रतिमा उंचावण्यासाठी केलेले प्रयत्न / योगदान
१०) मंत्रालय (खुद्द) व क्षेत्रिय स्तरावर प्राप्त झालेली न्यायालयीन प्रकरणे, त्यावर वेळीच सादर केलेली प्रतिज्ञापत्रे आणि प्रकरणाचा जिद्दीने आणि चिकाटीने पाठपुरावा करुन निकाल शासनाच्या बाजूने लागण्याच्या दृष्टीने व शासकीय खर्चात त्या अनुषंगाने झालेली कायमस्वरुपी बचत



Scanned with OKEN Scanner

याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांने दाखविलेले नेतृत्व व विशेष कौशल्य आणि बजावलेली भूमिका.

११) सर्वसामान्य जनता / लोकप्रतिनिधी यांच्याकडून येणाऱ्या मागण्या, विविध कामासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारी याबाबत वेळीच केलेली कार्यवाही. प्रशासन अधिक लोकाभिमुख, विकासात्मक व गतिमान होण्यासाठी आणि लोकांचा विकास हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून, त्यानुसार कामात दाखविलेली कार्यतत्परता, कार्यक्षमता इ. बाबींचा विचार व्हावा.

१२) नस्ती व्यवस्थापन व निर्णय घेण्याच्यादृष्टीने मोलाची मदत व या माहिती व प्रमाणानुसार योग्य निर्णय होण्याच्यादृष्टीने निष्ठापूर्वक व तळमळीने आवश्यक ती तपशील प्रयत्नपूर्वक जमा करून तपशीलवार व सुयोग्यरित्या प्रकरण सादर करण्याच्या प्रक्रियेतील संबंधित अधिकारी यांचा व कर्मचाऱ्यांचा सहभाग.

१३) पारंपारिक पध्दतीने काम न करता नवनवीन कल्पनांना प्रोत्साहन किंवा प्राधान्य देऊन सामाजिक, आर्थिक व राज्याच्या दृष्टीने व्यापक विचार करून समाजाच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेण्यामध्ये दाखविलेली आवड आणि रुची.

१४) सोपविलेले काम गुणवत्तापूर्वक, चिकित्सकपणे, परिपूर्ण आणि बारकाईने अभ्यास करून दर्जेदार पध्दतीने व निःपक्षपातीपणे प्रकरण सादर करण्याची कार्यशैली व हातोटी आणि त्यामुळे निर्णय प्रक्रिया सुलभ होण्यासाठी केलेले खास प्रयत्न.

१५) आपल्या अधिपत्याखालील कर्मचारी व सहकारी यांच्यामध्ये कार्यसंस्कृती ( work culture ) व कार्यनिती ( work ethics ) रुजविण्याचा व जोपासण्याचा केलेला प्रयत्न.

ई: सर्व विभागीय आयुक्तालंय स्तरावरील समित्यांकडून तसेच शासनस्तरावरील समित्यांकडून निवड झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची नांवे शासन स्तरावरुन एकत्रितरित्या प्रसिध्द करण्यांत येतील.

फ: सदर योजना प्रतिवर्षी चालू राहील.

ग: सदर योजनेचे दोन वर्षानंतर पुनर्विलोकन करण्यांत येईल.

.......................

प्रति.
सर्व विभाग प्रमुख
जिल्हा परिषद, जळगांव

जा.क्र. सामाप्रवि/स्थापना/आस्था/९८६/०५
सामान्य प्रशासन विभाग, जि.प. जळगांव
दिनांक ३/१०/०५

-२/- आपले विभागाकडील संवर्गात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे सदर शासन निर्णया नुसार प्रस्ताव तीन दिवसाच्या आत या कार्यालयाकडेस सादर करावे.

D:\WED\2005\KBS\Award

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, जळगांव (का/...)

प्रत :- सामाप्रवि शाखा- २,४,६,७, यांचेकडे जि.प. जळगांव